# भारतातील आधुनिक शिक्षण पद्धतीच्या विकासाचा ऐतिहासिक मागोवा

**प्रा. डॉ. नीता जगताप**
इतिहास विभाग
स.भू.बा. उर्फ आप्पासाहेब जेधे
कला, वाणिज्य आणि विज्ञान
महाविद्यालय, पुणे

**प्रास्ताविक :**

1765 मध्ये ईस्ट इंडिया कंपनीच्या हातात भारतातील राजकिय सत्ता आल्यानंतर ही शिक्षणात कोणत्याच पद्धतीचे बदल करण्यात आले नाहीत. 1781 मध्ये वॉरेन हेस्टिंगजने कलकत्तात एक मदरसा स्थापन केला याठिकाणी अरबी व फारसीचे अध्ययन सुरू झाले. 1791 मध्ये बनारसचा ब्रिटीश रेसिडेंट डंकन ह्याने हिंदू धर्म संस्कृतीचा अभ्यास करण्यासाठी बनारस येथे संस्कृत महाविद्यालयाची स्थापना केली.

1813 च्या चार्टर कायद्यात भारतात शिक्षण प्रसारासाठी वार्षिक एक लक्ष् रू. संमत करण्यात आले. कंपनीच्या प्रशासकीय कामासाठी इंग्रजी स्थानिक भाषेत शिक्षणाची आवश्यकता इंग्रजी अधिकाऱ्यांना वाटत होती. 1817 मध्ये कलकत्ताला हिंदू कॉलेज उघडण्यासाठी अनुदान प्राप्त झाले होते. तसेच विज्ञानाचे शिक्षण देण्यास सुरूवात झाली होती. लॉर्ड मेकॉलेच्या शिक्षणाचा दृष्टीकोन मान्य करून ब्रिटीश सरकारने 7 मार्च 1835 रोजी मेकॉले पद्धतीने शिक्षण देण्यास सुरूवात करण्याचा ठराव मांडण्यात आला.

**वूडचा अहवाल 1854 :**

1854 भारतीय शिक्षणाची मॅग्ना कार्ट वूडचा अहवाल मानला जातो. वूडचा अहवालामध्ये इंग्रजी माध्यमातून शिक्षण देण्यास सुरूवात झाली. तसेच खेड्यामधून प्राथमिक शाळा सुरू करण्यात आल्या व खाजगी क्षेत्रातील शाळांना अनुदान पद्धती सुरू करण्यात आली व स्त्री शिक्षणाला चालना देण्यास सुरूवात झाली होती.

वूडच्या शिफारसीमुळे भारतीय शिक्षण व्यवस्थेत मोठ्या प्रमाणावर बदल घडून आले. 1855 मध्ये कलकत्ता, मुंबई व मद्रास याठिकाणी विद्यापीठाची स्थापना करण्यात आली.

**<u>हंटर आयोग :</u>**

1882 मध्ये हंटर आयोगाची स्थापना करण्यात आली व भारतीय शिक्षण पद्धती बदल करण्यासाठी अभ्यास करण्यासाठी समिती नियुक्त केली. या समितीने प्राथमिक शिक्षणाच्या प्रगतीकडे लक्ष केंद्रित करणे व जिल्हा व नगर मंडळाकडे नियंत्रण दिले. तसेच विद्यापीठाला प्रवेशासाठी परिक्षा घेण्यास सांगितले. स्त्री शिक्षणाचा सहभाग वाढविण्यासाठी उपाययोजना करण्यात आल्या.

**<u>भारतीय विद्यापीठ कायदा - 1904 :</u>**

लॉर्ड कर्झनने 1901 मध्ये सिमला येथे भारतातील उच्च शिक्षण विद्यापीठ अधिकाऱ्याचे संमेलन भरविले. याठिकाणी शिक्षणात बदल करण्यासाठी 150 ठराव संमत करण्यात आले. त्यांच्या आधारे 1904 चा भारतीय विद्यापीठ कायदा तयार करण्यात आला.

या कायद्याने विद्यापीठामध्ये व्याख्यात्याच्या नेमणुका, प्रयोगशाळा व ग्रंथालयाची नियुक्ती करण्यात आली. तसेच विद्यापीठाच्या सुधारणांसाठी 5 लक्ष रु. पाच वर्षासाठी सरकारी अनुदानाची सुरूवात केली.

**<u>सॅंडलर विद्यापीठ आयोग 1917-19 :</u>**

1917 मध्ये सरकारने कलकत्ता विद्यापीठाच्या समस्याचा अभ्यास करून त्यावर अहवाल देण्यासाठी आयोगाची नियुक्ती केली. लीडस विद्यापीठाचे कुलगुरू एम. इ. सॅडलर ह्यांना आयोगाचे अध्यक्ष नियुक्त केले व आयोगाच्या सदस्यामध्ये आशुतोष मुखर्जी व झियाउद्दीन अहमद हे दोन भारतीय होते.

या समितीने शालेय शिक्षण 12 वर्षाचे व पदवीचे शिक्षण तीन वर्षाचे केल्या.

**सार्जह योजना :**

1944 मध्ये राष्ट्रीय शिक्षण योजना तयार केली. तिला सार्जट योजना म्हटले जाते. या योजनेनुसार 6 ते 11 वर्षाच्या बालकांना मोठ्या प्रमाणावर नि:शुल्क शिक्षण अनिवार्य करण्यात आले. 11 ते 17 वर्षाच्या मुलांसाठी 6 वर्षाची वेगळी शिक्षण पद्धती तयार करण्यात आली. तसेच तंत्रज्ञानाचे शिक्षण देण्यास सुरूवात झाली.

**राधाकृष्ण आयोग 1948-49 :**

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर राधाकृष्ण आयोगाची 1948 मध्ये स्थापना करण्यात आली. या समितीने विद्यापीठ शिक्षणासंबंधी पुढील शिफारसी केल्या.

1. विद्यापीठ स्तराआधी 12 वर्षाचा अध्ययन काळ असावा.
2. शिक्षण हा विषय समवर्ती सूचीत टाकावा.
3. विद्यापीठ शिक्षणावर देखरेख करण्यासाठी एक 'विद्यापीठ अनुदान आयोग' स्थापन करावा.

या शिफारसीनुसार 1953 मध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाची स्थापना करण्यात आली.

**कोठारी आयोग :**

1964-66 मध्ये डी.एस.कोठारी ह्यांच्या अध्यक्षतेखाली एका आयोगाची नियुक्ती करण्यात आली. या समितीच्या शिफारसीनुसार भारतात प्राथमिक शिक्षण मोफत करण्यात आले. विज्ञान व शिक्षण संशोधनाची वाढ करण्यात आली. तसेच राष्ट्रीय उत्पन्नातील 6% रक्कम शिक्षणावर खर्च करणे या शिफारसी करण्यात आल्या.

**नवे शैक्षणिक धोरण 1886 :**

पंतप्रधान राजीव गांधीच्या यांच्या काळात नवीन शैक्षणिक धोरण आखण्यात आले. या धोरणानुसार समाजाला गतिमान विकास व परिवर्तनाचे उद्दिष्ट्ये ठेवण्यात आले.

या धोरणानुसार उच्च शिक्षण घेण्याची संख्या वाढविणे, जागतिक स्तरावर टिकण्यासाठी मनुष्यबळ प्रशिक्षित करणे. तसेच राष्ट्रप्रेम, धर्म निरपेक्षता, आंतरराष्ट्रीय जाणीव दृढ विश्वास करणे हा एक उद्देश होता.

**समरोप :**

भारतात शिक्षणाची मुहूर्तमेढ उभी करण्याचे काम ईस्ट इंडियाच्या मॅकोले शिक्षण पद्धतीला द्यावे लागले. कारण धार्मिक शिक्षण सोडून इतर कोणतेही शिक्षण दिले जात नव्हते. तसेच अनेक ब्रिटीश अधिकाऱ्याने शिक्षणासंदर्भात दूरदृष्टीकोन ठेवल्यामुळे भारतीयांचा शैक्षणिक विकास घडून आला.

स्वातंत्र्यानंतर राधाकृष्णन आयोगाने विद्यापीठ अनुदान योगाची स्थापना करून सामाजिक, वैज्ञानिक दृष्टीकोन, तंत्रज्ञानाचे शिक्षण देण्यासाठी आय.आय.टी. इस्त्रो, वैज्ञानिक शिक्षणाची केंद्र पंडित जवाहरलाल नेहरूंनी सुरू केली. तसेच 1986 च्या नवीन शैक्षणिक धोरणामुळे पंतप्रधान राजीव गांधीच्या काळात संगणकाचे शिक्षण सुरू झाले. या सर्व गोष्टीमुळे भारत जगात शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक प्रगती करू शकलेला दिसून येतो.

**संदर्भ :**

1. आधुनिक भारताचा इतिहास - डॉ. बी. एल. गोवर, प्रकाशक - एस. चंद. कंपनी
2. आधुनिक भारताचा इतिहास
3. विकीपिडीया.
4. बी.बी.सी. न्यूज.